अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना. वार्षिक अनुदानाच्या रक्कमेत वाढ करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक:- बीसीएच-२०१६/प्र.क्र.२९३/शिक्षण-२
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- १४ ऑक्टोबर, २०२६

<u>वाचा</u>- १. सामाजिक न्याय विभाग, शासन निर्णय क्रमांक:-बीसीएच-२०१६/प्र.क्र.२९३/शिक्षण-२, दि.२६.१२.२०२४.
२. सामाजिक न्याय विभाग, शासन निर्णय क्रमांक:-बीसीएच-२०१६/प्र.क्र.२९३/शिक्षण-२, दि.१३.८.२०२५.

<u>प्रस्तावना</u>:-

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या चांगल्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विभाग, जिल्हा व तालुका स्तरावर मागासवर्गीय मुलामुलींच्या शिक्षणासाठी एकूण ४४९ शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. त्यामध्ये मुलांसाठी २३१ व मुलींसाठी २१८ शासकीय वसतिगृहे सुरू आहेत. सदर वसतीगृहांमध्ये विद्यार्थ्यांना विहित अटी व शर्तीनुसार प्रवेश देण्यात येतो. प्रवेशित विद्यार्थ्यांना निवास, भोजन, शैक्षणिक साहित्य व दैनंदिन खर्चासाठी निर्वाह भत्ता व आवश्यक सोयी-सुविधा दिल्या जातात. राज्यात दिवसेंदिवस वाढत असलेली व्यावसायिक, बिगर व्यावसायिक महाविद्यालयांची संख्या आणि तेथे प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची वाढत असलेली संख्या यामुळे सर्वच विद्यार्थ्यांना वसतिगृहातील जागेची मर्यादा लक्षात घेता प्रवेश देणे शक्य होत नाही. पर्यायाने मोठया प्रमाणात विद्यार्थी शासकीय वसतिगृह प्रवेशापासून वंचित राहतात, त्यामुळे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी विविध अडचणींना सामोरे जावे लागत असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस मर्यादा येत आहेत.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना तात्काळ वसतिगृह सुरु करुन तेथे प्रवेश देण्यासाठी जागेची उपलब्धता व बांधकामासाठी लागणारा कालावधी लक्षात घेता मर्यादा येतात. सबब, मागासवर्गीय शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती तथा नवबौध्द घटकांतील इयत्ता ११ वी, १२ वी तसेच इयत्ता १२ वी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा विद्यार्थ्यांना स्वत: उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट जमा करण्याकरीता शासनाने दि. ६ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये "**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना**" सुरु केलेली आहे. सदर योजनेच्या अटी व शर्तींमध्ये संदर्भाधीन क्र.१ व २ येथील शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आलेली आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंतर्गत शासकीय वसतीगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या तसेच शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी रीतसर अर्ज केलेल्या परंतु शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांपैकी इयत्ता ११ वी, १२ वी तसेच इयत्ता १२ वी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयात/ शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास, शैक्षणिक साहीत्य, निर्वाह भत्ता, व इतर आवश्यक सोयी-सुविधा स्वत: उपलब्ध करुन घेण्यासाठी देण्यात येणाऱ्या वार्षिक अनुदानात कालानुरूप वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>:-

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी पात्र असलेल्या तसेच, वसतिगृह प्रवेशासाठी रीतसर अर्ज केलेल्या परंतु शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांपैकी इयत्ता ११ वी व १२ वी तसेच इयत्ता १२ वी नंतरच्या व्यवसायिक तसेच बिगर व्यवसायिक

अभ्यासक्रमासाठी विविध स्तरावरील महाविद्यालयात/ शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा विद्यार्थ्यांना स्वत: उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक ती रक्कम सबंधित विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये जमा करण्यासाठी **"भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना"** सुरु केलेली आहे. सदर योजनेंतर्गत खालीलप्रमाणे वार्षिक अनुदानाच्या रक्कमेत वाढ करून संबंधित विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात (Aadhar Linked Bank Account) थेट जमा करण्याचा निर्णय मा.मंत्रीमंडळाच्या दि. ०६ ऑक्टोबर,२०२६ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ. क्र.	खर्चाची बाब	मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड, नागपूर या ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी	इतर महसूल विभागीय शहरातील व उर्वरीत "क" वर्ग महानगरपालीका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी	इतर जिल्हयाच्या ठिकाणी तसेच महानगर पालिकेच्या हद्दीपासून ५ कि.मी. परिसरात असलेली महाविदयालये/ शैक्षणिक संस्था या ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी	तालुक्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी
१.	भोजन भत्ता	४२,०००	३७,०००	३२,०००	३०,०००
२.	निवास भत्ता	२८,०००	२१,०००	१७,०००	१३,०००
३.	निर्वाह भत्ता	१०,०००	१०,०००	८,०००	७,०००
एकुण		**८०,०००**	**६८,०००**	**५७,०००**	**५०,०००**

तसेच, उपरोक्त रक्कमेव्यतिरिक्त वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्ष रु.८,०००/- व अन्य शाखेतील विद्यार्थ्यांना प्रतिवर्ष रु.४,०००/- इतकी रक्कम शैक्षणिक साहित्यासाठी ठोक स्वरुपात देण्यात येईल.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपरिक संदर्भ क्र.१०४४/२०२६, दि.३१.८.२०२६ व मा. मंत्रीमंडळाच्या दि.०६.१०.२०२६ रोजीच्या बैठकीतील मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक २०२६१०१४१३०६४९११२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

HARSHADEEP SHRIRAM KAMBLE

Digitally signed by HARSHADEEP SHRIRAM KAMBLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SOCIAL JUSTICE AND SPECIAL ASSISTANCE DEPARTMENT, 2.5.4.20=abe9338c4cb37835a2aa15008d7fc329c11b1640556aa5d5698bffb566d33473, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=995C99CB25735CCC93503D0DC5680E54902C3A705DFDCDAF9A8A4463856F5154, cn=HARSHADEEP SHRIRAM KAMBLE
Date: 2026.10.14 13:16:19 +05'30'

(डॉ. हर्षदीप कांबळे)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,राजभवन,मलबार हिल,मुंबई,
२. मा.सभापती,विधानपरिषद यांचे खाजगी सचिव,विधानभन,मुंबई,
३. मा.अध्यक्ष,विधानसभा यांचे खाजगी सचिव,विधानभन,मुंबई,
४. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय,मुंबई,
५. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय,मुंबई,
६. मा.विरोधी पक्ष नेता,विधानसभा/विधानपरिषद,विधानमंडळ,मुंबई,
७. मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. मा.राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
१०. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
११. आयुक्त, समाजकल्याण, पुणे,
१२. महालेखापाल (महाराष्ट्र -१/२), (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
१३. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण,
१४. सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण,
१५. शिक्षण-२ संग्रहार्थ.